RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# शैक्षणिक संस्थाच्या मूल्यमापनाचे विकेंद्रीकरण

**प्रा. डॉ. तारसिंग नाईक**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री महाराणी ताराबाई शासकीय
अध्यापक महाविद्यालय,
कोल्हापूर.

**प्रास्ताविक**

राष्ट्राची प्रगती प्रामुख्याने शिक्षक प्रशिक्षणावर आधारित आहे. राष्ट्राला आवश्यक असणारी संपत्ती शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र सेवेसाठी वापरली जाते. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांची गुणवत्ता वाढ व गुणवत्ता विकासाचे मूल्यमापन होणे अत्यंत आवश्यक आहे. सक्षम शिक्षक या संस्थेतून प्रशिक्षण पूर्ण करून विविध शैक्षणिक संस्थामध्ये भविष्यात शिक्षक म्हणून काम करतात. शैक्षणिक संस्थामध्ये भविष्यात शिक्षक म्हणून काम करतात. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात मूल्यमापनाला अनन्यसाधारण महत्व असते. सर्वांगीण विकास या संकल्पनेत राष्ट्राचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास साधण्यासाठी कालबध्द मूल्यमापनाच्या भविष्यकालीन योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी लागते. शैक्षणिक संस्थामध्ये मूल्यमापनाच्या दृष्टीने भौतिक व मानवी घटक यांचे महत्वाचे स्थान आहे.







शैक्षणिक संस्थेचे मूल्यमापनात भौतिक घटकात वातावरण उत्साही मनाला प्रसन्न करणारे अध्ययन व अध्यापन यांच्या दृष्टीने चांगले असावे. मानवी घटकात परस्पर प्रेम, सहकार्य, सहानुभूतीची भावना निर्माण करणे, प्रत्येकास आपल्या कार्याची जाणीव करून देणे. ज्यामुळे मानवी घटक कार्यक्षम, कार्यतत्पर राहून शैक्षणिक संस्थेचा गुणवत्ता विकासाकरिता फायद्याचे आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115




शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने आवश्यक सोयीसुविधा विद्यार्थी केंद्रबिंदू मानून आहे किंवा नाही याचा विचार शैक्षणिक संस्था मूल्यमापनातून निश्चितच होतो. याकरिता मूल्यमापनाचे विकेंद्रीकरण निचत्तम स्तरापर्यंत होणे महत्वाचे आहे. मूल्यमापन करून गुणवत्ता विकास व्हावा या दृष्टीने खालील प्रशासकीय संस्थांची स्थापना होणे अत्यंत महत्वाचे आहे.

1. SAAC - State Assessment and Accreditation Council.
   राज्य मूल्यमापन व मान्यताप्राप्त परिषद
2. DAAB - District Assessment and Accreditation Board.
   जिल्हा मूल्यमापन व मान्यताप्राप्त मंडळ
3. TAAB - Taluka Assessment and Accreditation Board.
   तालुका मूल्यमापन व मान्यताप्राप्त मंडळ
4. RAAC - Rural Assessment and Accreditation Committee
   ग्रामीण मूल्यमापन व मान्यताप्राप्त समिती

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115







शैक्षणिक संस्थांना मान्यताप्राप्त झाल्यानंतर नियमाप्रमाणे कार्य करीत आहे किंवा नाही याचे मूल्यमापन करून मान्यताप्राप्त श्रेणी प्रदान करण्याचा अधिकार वरील संस्थांना असावा. मूल्यमापन करताना शाळा व शिक्षकांच्या कामकाजाचे मूल्यमापन करून संबंधितांना मार्गदर्शन व प्रत्याभरण करणे, शिक्षकांच्या अध्यापन कार्याचे पर्यवेक्षण करणे, संपूर्ण शाळेचे कामकाज, दप्तर, अभ्यासानुवर्ती कार्यक्रम, अध्यापन इत्यादींचे या दृष्टीने मूल्यमापन व्हावे.

**मूल्यमापनाचे विकेंद्रीकरणामुळे शैक्षणिक संस्थेत होणाऱ्या अपेक्षित सुधारणा :**

1. शैक्षणिक संस्थाच्या सर्व विद्याशाखामध्ये संशोधन उपक्रमाचे संयोजन करून अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल व यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढे.

2. अभ्यासक्रमामध्ये पुनर्रचना करून अध्ययन–अध्यापन पध्दतीत सुधारणा घडवून आणता येईल.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

3. शैक्षणिक संस्थेतील शिक्षकांना सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून नवीन मूल्यमापन तंत्राचा विकास करणे सुलभ होईल.

4. शैक्षणिक संस्थांचा मूल्यमापनामुळे ज्ञानाचा प्रसार करणे व शैक्षणिक समस्यांची सोडवणूक करणे सोपे होईल.

5. शैक्षणिक संस्थेत शिक्षणविषयक नवीन विचारप्रवाहांचा शिक्षकांना परिचय करून देता येईल.

6. शैक्षणिक संस्थेत संशोधनाला उत्तेजन देऊन संशोधन प्रकल्पाचा विकास करता येईल.

**महत्व**

शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन करून मान्यताप्राप्त श्रेणी व त्याचा परिणाम अनुदान किंवा संस्था मान्यतेवर व्हावा जेणेकरून शाळेची गुणवत्ता, नवनवीन उपक्रम राबविण्याची प्रेरणा निर्माण होईल. शैक्षणिक संस्थातील अध्ययन–अध्यापनाचा दर्जा, गुणवत्ता विकास, सामाजिक परिस्थिती व शैक्षणिक संस्था याविषयी संस्कार निर्मितीस पोषक वातावरण निर्माण होईल. मूल्यमापन करून शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व अंगांचे मूल्यमापन, समस्यांचा शोध, उपाययोजना व मूल्यमापन यांचा समावेश करता येईल.

मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये शिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण करता येईल. या अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच वाढेल व यामुळे माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण यांचा गुणवत्तेवर विधायक परिणाम होईल. शैक्षणिक संस्थांचा मूल्यमापन व मान्यताप्राप्तीचा विकेंद्रीकरणामुळे नियमानुसार शैक्षणिक संस्थांचे कामकाज, प्रशासन, अध्ययन–अध्यापन इत्यादींचे परीक्षण करणे सोयीचे होईल.

**संद ॅ**

1. अकोलकर ग.वि. (1971) : महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन, शारदा प्रकाशन, पुणे.
2. अहेर हिरा (1995) : उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर.
3. मार्च 2005 : 'सर्व समावेशक शिक्षण', शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर, म.रा.श.सं. व प्र.प. पुणे – 30.
4. ॲड.अभया शेलकर : माध्यमिक शाळा संहिता, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद.
5. डॉ.वसंत काळपांडे : शालेय प्रशासन व मानवीसंबंध, अनमोल प्रकाशन, पुणे.
6. डॉ.बी.जी.अहिरे : शैक्षणिक व्यवस्थापन, फडके प्रकाशन, कोल्हापूर.